# 17 बेरोजगारांची दिड कोटीने फसवणूक

## शिवसेनेच्या शहर अध्यक्षासह चार जणांविरुध्द अंजनगाव सुर्जी ठाण्यात गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी( दि.16 )** – रेल्वेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून 17 बेरोजगार तरुणांची 1 कोटी 56 लाखांनी फसवणूक केल्याची घटना अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. मंगेश वसंतराव हेंड (38, रा. रामटेकपुरा, अकोट, जि. अकोला) यांच्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी 15 जानेवारी रोजी आरोपी योगेश ऊर्फ मुन्ना इसोकार (45, रा. अंजनगाव सुर्जी), श्रीकांत बाबुराव फुलसावंदे (रा. राजुरा, ता. जि. अमरावती), विलास गोवर्धन जाधव (रा. परतवाडा) व मोन्टी ऊर्फ मेघराजसिंग चव्हाण (ठाकुर) (रा. मसानगंज, नांदगाव पेठ, अमरावती) यांच्याविरुध्द विविध गुन्हा नोंदविला आहे. आरोपींमध्ये मुन्ना इसोकार हा व्यक्ती शिवसेना शिंदे गटाचा शहर अध्यक्ष आहे. या घटनेमुळे राजकीय क्षेत्रात चांगलीच खळबळ उडाली आहे.



फसवणुकीची तक्रार प्राप्त होताच याबाबत माहिती तपासून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून याबाबत सखोल चौकशी सुरू केली आहे.

**प्रकाश अहिरे**
**पोलीस निरीक्षक,**
**अंजनगाव सुर्जी.**

### मेडिकलसाठी बोलाविले मुंबईला

आरोपींनी सर्व कॅन्डीडेट्सना मुंबई भायखळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल सेंट्रल रेल्वे हॉस्पिटल येथे बोलावून मेडिकल केले व त्यांना सांगितले की तुमची रेल्वे अधिकार्यांससोबत लवकरच अंजनगाव सुर्जी येथे भेट घालून देणार आहे. त्यानंतर 23 जानेवारी 2022 रोजी मुन्ना इसोकार यांनी अंजनगाव येथे माझ्यासह इतर 17 लोकांना बोलावले व एका फ्लॅटवर नेऊन श्रीकांत बाबुराव फुलसावंदे (रा. राजुरा), विलास गोवर्धन जाधव (रा. परतवाडा), मॉन्टी उर्फ मेघराज सिंग चव्हाण ठाकूर (रा. मसाजगंज, अमरावती) यांच्यासोबत रेल्वे अधिकारी म्हणून भेट घालून दिली. त्यांनी सर्वांचे शैक्षणिक कागदपत्र पाहिले त्यानंतर सर्व कॅन्डीडेट्सनी मुन्ना इसोकार यांच्या घरी आणखी रक्कम दिली.

### अशी आहे फसवणूकीतील रक्कम

मंगेश हेंड 9 लक्ष, जोशना हेंड 5 लक्ष, पवन ताळे 10 लक्ष, मयूर नेमाडे 9 लक्ष 50 हजार, विजय दातीर 9 लक्ष, गणेश रेखाते 10 लक्ष, प्रल्हाद थोरात 10 लक्ष, आदित्य पाकधुणे 10 लक्ष , अक्षय लोणारे 10 लक्ष, प्रशांत लाडोळे 10 लक्ष, दिनेश सावरकर 10 लक्ष, निलेश बोडखे 15 लक्ष, सतीश वडाळे 10 लक्ष, सुरज हटवार 8 लक्ष, सुनिता इंगळे 10 लक्ष, महेंद्र पाखरे 6 लक्ष, आशिष धर्माळे 3 लक्ष, गव्हाचे 2 लक्ष 50 हजार असे एकूण 1 कोटी 56 लक्ष रुपये या सर्व कॅंडिडेट्सनी योगेश उर्फ मुन्ना इसोकार यांच्यामार्फत नगदी व बँक खात्यामध्ये दिले. आरोपींविरुध्द 417, 419, 420, 465, 468, 471,504, 506, 34 नुसार गुन्हा दाखल केला असून ठाणेदार प्रकाश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करिता आहे.

### माजी आमदारांचे नाव सांगितले

मंगेश हेंड याने आपल्या तक्रारीमध्ये सांगितले की, मंगेश यांची डिसेंबर 2021 मध्ये योगेश इसोकारसोबत ओळख झाली. त्यावेळी त्याने सांगितले की, मी शिवसेना शिंदे गटाचा शहर प्रमुख आहे. मुन्ना इसोकार यांच्या म्हटल्यावर त्यांचे व माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ यांच्यासोबत चांगली ओळख असून तुला रेल्वे डिपार्टमेंटला नोकरीवर लावून देतो, परंतू त्याकरिता तुला पैसे खर्च करावे लागतील, पण सोबत एकूण दहा ते पंधरा कॅंडिडेट्स लागतील, प्रत्येकाला दहा लक्ष रुपये खर्च येणार आहे. तो तुम्हाला खर्च करावा लागेल अशी बतावणी केली. त्यानुसार मंगेशने आकोट येथील त्याचे काही नातेवाईक व इतर मित्र परिवारातील लोकांना याबाबत सांगितले व त्यानुसार मुन्ना इसोकार यांच्यासोबत व्यवहार सुरू झाला. इसोकार यांच्या सांगण्यानुसार परतवाडा येथील गोवर्धन जाधव यांच्यासोबत संपर्क साधून त्यांना पैसे दिले तसेच श्रीकांत फुलसावंदे (रा.राजुरा)यांच्यासोबत संपर्क साधून काही रक्कम यांच्याकडे देण्यात आली. तसेच महिंद्रा कोटक त्रिमूर्ती नगर नागपूर बँक येथील खात्यात आरटीजीएस जमा केले. याप्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार प्रकाश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करित आहे.

# मित्र निघाला लुटारु, 96 लाखांनी फसविले

## आर्कीटेक तरुणीची पोलिसात धाव

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )** – बालमित्रानेच उद्योजक असलेल्या एका तरुणीची तब्बल 96 लाख 9 हजार 170 रुपयांनी फसवणूक केल्याची 15 जानेवारी रोजी गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी भूषण मारोती महल्ले (रा. श्रीमंगल कॉलनी, अमरावती) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

शहरातील व्हीएमव्ही मार्गावरील परिसरात राहणारी तक्रारदार तरुणी ही आर्किटेक्चरमधून पदवीधर आहे. फॅशन डिझायनिंगची आवड असल्याने तिने ऑनलाइन रेडिमेड कपडे खरेदी-विक्रीच्या व्यवसायात पाऊल टाकले. दरम्यान, कोरोना काळात लॉकडाउन लागल्याने तिच्यासमोर शिपिंगची समस्या निर्माण झाली. या काळात




बालमित्र असलेल्या आरोपी भूषणने तिला पुणे येथे येण्याची ऑफर दिली. तुला येथे ट्रान्सपोर्टेशनची अडचण येणार नाही, अशी बतावणी त्याने केली. त्याच्यावर विश्वास ठेवत तरुणीने आपल्या भावाला सोबत घेऊन ऑगस्ट 2021 मध्ये पुणे गाठले. शॉप ॲक्ट लायसन्स व वेबसाइटला मर्यादा आहेत, असे सांगून भूषणने तरुणीला तिचा भाऊ आणि ती असे दोन संचालक घेऊन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी सुरू करण्याची सूचना केली. त्याने कंपनीदेखील नोंदणीबद्ध केली. परंतु, काही दिवसांनी आपल्या भावाऐवजी भूषण हा स्वतःच त्या कंपनीचा संचालक होऊन त्याने 50 टक्के शेअर स्वतःच्या नावे घेऊन नोंदणी केल्याचे तरुणीच्या लक्षात आले. त्याबाबत तरुणीने विचारणा केल्यावर त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. दरम्यान, भूषणने कंपनीच्या नावे 25 लाख रुपये कर्ज काढले. मात्र, ते वैयक्तिक खर्चासाठी वापरले. त्यामुळे तरुणीचा त्याच्यावरील विश्वास उडाला. त्याने तरुणीच्या एटीएम कार्डचासुद्धा गैरवापर केला. एवढेच नव्हे, तर त्याने त्याच्या बहीण व जावयासाठी तरुणीच्या पैशांचा वापर केला. अमरावतीहून सोनेसुद्धा खरेदी केले. भूषणने तरुणीच्या बँकेच्या खात्यातून 7 लाख 88 हजार 305 रुपये व 77 लाख 47 हजार 683 रुपये परस्पर काढले. तसेच त्याने कर्ज खात्यातूनसुद्धा 10 लाख 72 हजार 998 रुपयांचा अपहार केला. तरुणीने भूषणला पैसे परत मागितल्यावर त्याने 35 लाख रुपये देऊन या सर्व गोष्टींचा निपटारा करून घे, असे तिला बजावले. मात्र, तिने त्याला नकार दिला. त्यानंतर तरुणीने गाडगेनगर ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# विविध घटनेत दोन ठार, चार गंभीर

## धारणी तालुक्यात अपघाताची मालिका

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी, ( दि.16 )**– तालुक्यात अवघ्या काही तासाच्या फरकाने दाबका व राणामालुर येथे दोन अपघात घडले ज्यामध्ये दोघांचा मृत्यू झाला.

धारणी तालुक्यात सद्यस्थितीत यात्रांची रेलचेल सूरु आहे. टीटम्बा, काकरमल, राजपूर येथे यात्रा सूरु असुन मोठ्यप्रमाणावर वाहनांची वर्दळ आहे. यामध्ये मोठ्याप्रमाणात अपघात होत असल्याचे दिसत आहे. राजपुर यात्रेतून परत गावाकडे जात असताना राजपुर फाट्याजवळ



अज्ञात वाहनाच्या धडकेत संतोष काशिराम चीलात्रे (वय 35 रा.दाबका) याचा मृत्यू झाला. यावेळी मोतीराम चिलात्रे (55) व कालू कासदेकर (24) व संतोष असे तिघेजण दुचाकीवर स्वार होते. अपघात जखमी अन्य दोघांना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे. अन्य एका अपघातामध्ये राणामालुर येथील संतूलाल झनकलाल सावलकर (वय 25) हा टिटम्बा यात्रेतून परत आपल्या गावी राणामालुर येथे जात असताना धारणी ते परतवाडा मार्गावर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने संतुलाल जागीच ठार झाला. तर दुचाकीवर मागे बसलेली त्याची पत्नी ज्योती संतुलाल सावलकर व राजकुमार भिलावेकर (24) हे गंभीर जखमी झाले.

# प्रेमीयुगलांना हटकल्याने कुटुंबावर हल्ला

**पत्रकार कॉलनीतील घटना**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )** – शहरातील पत्रकार कॉलनीतील ग्रीन जिममध्ये बसलेल्या अल्पवयीन प्रेमीयुगुलांना बाहेर काढण्यात आले. परंतू या अल्पवयीन मुलाने काही तरुणांना सोबत घेऊन एका कुटुंबासह इतर लोकांना मारहाण केली. या घटनेनंतर प्रचंड गोंधळ उडाला होता. अखेर परिसरातील रहिवाश्यांनी गाडगेनगर पोलिस ठाणे गाठले. या घटनेवरून दिसून येते की, अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे.

बुधवारी रात्री उशिरा नऊ वाजण्याच्या सुमारास पत्रकार कॉलनीतील ग्रीन जिमजवळ एक मुलगा आणि दोन मुली बसले होते. दरम्यान काही वेळाने एक मुलगा व मुलगी तेथे पोहोचले. त्यांचे अंधाराचा फायदा घेत अश्लील कृत्य व बोलणे सुरू केले. हा प्रकार त्या परिसरात राहणार्या नागरिकांच्या लक्षात आला. त्यावेळी त्यांनी या मुला-मुलींना हटकले. परंतू त्या मुलांनी त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर या परिसरातील काही महिला रात्रीचे जेवण आटोपून बाहेर फिरत होत्या. शाळेच्या ड्रेसवर असलेल्या मुली महिलांना दिसल्या. त्यावेळी त्यांनीही या मुला-मुलींना हटकले. त्यामुळे अल्पवयीन मुलगा संतापला आणि तो तेथून निघून गेला. परंतू त्याने काही वेळातच त्याने आपल्या काही सहकाऱ्यांना लाठ्या-काठ्या घेऊन बोलावून घेतले. दरम्यान त्याने या परिसरातील अनंता मस्करे, हेमंत मस्करे, वसंता मस्करे, मुलगी पलक आणि अभिजीत सव्वालाखे यांना मारहाण केली. त्यामुळे ते जखमी झाले. दरम्यान त्यांनी आवारात उभ्या असलेल्या कारवर दगडफेक केली. हा गोंधळ पाहून परिसरातील नागरिक गोळा झाले. या हल्ल्याने संपूर्ण नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर काही तरुणांनी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले असून रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ईसारचिठ्ठी एकाशी, घर विकले दुसऱ्याला

## आरोपीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )** – ईसारचिठ्ठी करून दुसऱ्यालाच घर विकून एकाची फसवणूक करण्यात आली. ही घटना 15 15 जानेवारी रोजी राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी तक्रारीवरून आरोपी अजय रामभाऊ मोरे (रा. जयनगर, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. शहरातील हरिओम कॉलनी येथील रहिवासी प्रकाश काशीराव पुसदकर (45) यांनी अजय मोरे याच्या मालकीचे जेवडनगर येथील घर खरेदी करण्याचा सौदा निश्चित केला. त्यानुसार प्रकाश पुसदकर यांनी 15 सप्टेंबर 2023 रोजी ईसारचिठ्ठी केली. ईसारचिठ्ठीच्या दिवशी प्रकाश पुसदकर यांनी अजय मोरे याला 3 लाख रुपये रोख दिले. सोबतच 5 लाख रुपयांचा धनादेशसुद्धा दिला. ईसारचिठ्ठीप्रमाणे 15 मार्च 2024 पर्यंत त्या घराचे खरेदीखत व ताबा देण्याचे त्याने लिहून दिले. त्यानुसार प्रकाश पुसदकर यांनी खरेदीखतासाठी अजय मोरे याला आपल्या वकीलामार्फत नोटीस पाठविली. 15 मार्च 2024 रोजी प्रकाश पुसदकर हे दुय्यम निबंधक कार्यालयात हजर झाले. मात्र, अजय मोरे हा आलाच नाही. त्यावेळी प्रकाश पुसदकर यांना अजय मोरे याने ते घर वीरेश सावंत यांना बेकायदेशीरपणे विक्री करून खरेदी करून दिल्याचे समजले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर प्रकाश पुसदकर यांनी राजपेठ ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# कुटूंबाचे अपहरण करणाऱ्याला तीन वर्षांचा कारावास

## वरुड येथील जिल्हा सत्र न्यायालयाचा निर्णय

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.16 )**– अपहरण करून धमकी दिल्याप्रकरणातील एका आरोपीला वरुड येथील जिल्हा सत्र न्यायालयाने तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली, तर पाच आरोपींची निर्दोष मुक्तता केली. मुशाहीद्दीन नाजीममुद्दीन (34, रा. सौदागरपुरा, ता. जि. वाशिम) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. वरूड येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. आवटे यांच्या न्यायालयाने 16 जानेवारी रोजी हा निर्णय दिला. ही घटना शिरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत 6 नोव्हेंबर 2015 रोजी रात्री 1.30 वाजताच्या सुमारास घडली होती.

विधी सुत्रानुसार, 6 नोव्हेंबर 2015 रोजी फिर्यादी बदर खोन मोहम्मद अकदम पठाण (रा. रिध्दपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती) हे आपल्या कुटूंबासह घरात झोपले. दरम्यान मध्यरात्री आरोपी मुशाहीद्दीन नाजीममुद्दीन याने बदर खोन यांच्या घराचे दार वाजविले. त्यांनी दार उघडले असता त्यांचा भाचा आरोपी मुशाहीद्दीन हा घरात आला व त्याने बदर खोन यांच्या पत्नीच्या गळ्यावर चाकु लावला, तसेच त्याच्यासोबतच्या इतर आरोपींनी बदर खोन यांच्या लहान मुलाच्या गळ्यावर चाकु लावून सर्वांना गाडीमध्ये बसविले. तसेच पीडीत मुलीस बंदुकीचा धाक दाखवून गाडीमध्ये बंद करून जंगलात नेले. त्यावेळी पीडीतेसोबत लग्नासाठी जबरदस्तीने दबाव आणला, त्यानंतर त्यांनी वाशीममधील एका ठिकाणी नेऊन फिर्यादी व त्याच्या कुटूंबास रोडवर सोडून दिले होते. त्यानंतर या घटनेच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी आरोपींविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. सदर प्रकरणात पोलिसांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायालयातसमक्ष सरकार पक्षातर्फे आरोपीचा गुन्हा सिद्ध करण्याच्या अनुषंगाने एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. त्यानंतर दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर आरोपी मुशाहीद्दीन नाजीममुद्दीन याचा गुन्हा सिध्द झाले. याप्रकरणात जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. आवटे यांनी आरोपी मुशाहीद्दीन नाजीममुद्दीन याला भादंविच्या कलम 366 प्रमाणे तीन वर्षाचा साधा कारावास तसेच 5 हजाराचा दंड व दंड न भरल्यास पाच महिने साधा कारावास, तसेच कलम 452 नुसार दोन वर्ष साधा कारावास, 2 हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन वर्षाची अधिक शिक्षा, त्याचप्रमाणे कलम 504 अंतर्गत सहा महिने साधा कारावास, 1 हजाराचा दंड व दंड न भरल्यास एक महिना कारावासाची शिक्षा, तसेच कलम 506 नुसार दोन वर्ष साधा कारावास, दोन हजाराचा दंड व दंड न भरल्यास दोन महिने शिक्षा सुनावली. या तीन दंडाची रक्कम ही साक्षीदार पीडीतेच्या आईला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या सर्व शिक्षा ह्या एकत्र भोगाव्या लागेल. तर न्यायालयाने अब्दुल वशिम अब्दुल सईद, शेख इरफान शेख अकबर, मोहम्मद जाकिर शेख ख्वाजा, प्रशांत सुभाषराव खडसे (सर्व रा. वाशिम) यांची निर्दोष मुक्तता केली. सदरच्या फौजदारी प्रकरणात सरकारच्या वतीने अतिरीक्त शासकिय अभियोक्ता ॲड. शशिकिरण भगवतीप्रसाद पलोड यांनी सरकारच्या वतीने बाजु मांडली. यापूकरणातील तपासी अधिकारी आशिष बोरकर यांनी तपास पूर्ण केला, कोर्ट पैरवी शिरखेडचे पोलिस हवालदार मिलींद इंगळे आणि पोलिस हवालदार अरूण हटवार यांनी सहकार्य केले.

# हॉस्पीटलमध्ये शिरून मद्यपीची महिलेला धमकी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )** – सिटी कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कलोडे हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या एका महिलेला एका मद्यपीने लग्नाचा आग्रह धरून तिला धमकी देत विनयभंग केला. ही घटना 14 जानेवारी रोजी दुपारी 1.30 वाजता घडली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी अमन रौराडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार महिलेची 11 महिन्यांपूर्वी आरोपी अमनशी इर्विन रुग्णालयात भेट झाली होती. इर्विन हॉस्पिटलच्या उपचार चिठ्ठीवरील महिलेचा क्रमांक मिळवून आरोपी अमनने महिलेशी संपर्क साधला. मला तुझ्याशी लग्न करायचे आहे, असे सांगितल्यानंतर महिलेने 'मी तुला ओळखत नाही, मी तुझ्याशी लग्न करू शकत नाही' असे म्हणत फोन बंद केला. त्यानंतर 14 जानेवारी रोजी महिला कामावर गेली असता आरोपी दारूच्या नशेत तेथे आला. तेथील डॉक्टरांच्या केबिनमध्ये शिरून महिलेचा विनयभंग केला. तसेच तू माझ्याशी लग्न केले नाहीस तर मी तुला मारून टाकीन. अशी धमकी दिली. यावेळी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी महिलेची सुटका केली. या घटनेने महिला खूप घाबरली होती. त्यानंतर महिलेने अखेर सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपी अमन रौराडेविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, अमरावती**
e-mail ID :- eemjpdivamt@gmail.com Ph. No. 0721-2550538

**ई-निविदा सुचना क्र. 60 सन 2024-2025**

**कामाचे नांव :**- 156 गांवे व 2 शहरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत 50 एम. एल.डी. शहानुर जलशुध्दीकरण केंद्राचे संचालन व देखभाल करणे करीता अनुभवी कुशल / अकुशल बाह्य मनुष्यबळ पुरविणे बाबतचे कामांची निविदा मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग अमरावती यांचे कडून बी-1 पध्दतीने मागविण्यात येत आहेत. कामाची किंमत रु. 20,43,270/- असुन कामा संबंधीचा सविस्तर तपशिल दिनांक 20-01-2025 ला 16.00 वाजे पासुन विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्ड व महाराष्ट्र शासनाच्या ई टेंडर संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/nicgep/app वर उपलब्ध राहील.

**( विवेक सोळंके )**
**कार्यकारी अभियंता**

**विमाका/अम./जाही./1018/२०२४-२०२५**

# अपघाती मृत्यू नियंत्रणात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा!-जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.16 )**– रस्ते अपघातामध्ये वेळेवर वैद्यकीय मदत मिळावी, यासोबतच रस्ता सुरक्षेमध्ये सर्व यंत्रणांनी अपघाती मृत्यू नियंत्रणात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.



जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची सभा जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी कार्यकारी अभियंता रूपा गिरासे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.डी.के.सौंदळे, उपायुक्त गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कटियार म्हणाले, सुरक्षित वाहतुकीसाठी शासनाकडून निधी प्राप्त होत आहे. त्यामुळे या निधीचा चांगला विनियोग होणे गरजेचे आहे. प्रामुख्याने आतापर्यंत रस्ता सुरक्षा अंतर्गत सुचविण्यात आलेल्या सुधारणा प्रत्येक विभागाने प्राधान्याने पूर्ण कराव्यात. याचा अहवाल तातडीने देण्यात यावा. यासोबतच अपघाताची शक्यता असलेल्या ठिकाणांचा शोध घेण्यात यावा. यावर आपल्या स्तरावर उपाययोजना कराव्यात. आवश्यकता भासल्यास जिल्हा प्रशासनही मदत करेल. अपघात घडल्यास जखमींना तातडीने मदत पोहोचले यासाठी प्रयत्न करण्यात यावे. तसेच रूग्णालये आणि पोलिसांच्या मदत क्रमांकाचे फलक लावण्यात यावे.

गेल्या वर्षात ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अपघाती मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे शहरी भागात रस्ता सुरक्षा राबविण्यावर भर द्यावा लागणार आहे. तसेच अपघातातील जखमींना तातडीने औषधोपचार मिळणे गरजेचे आहे. यासाठी पोलिसांनी योग्य ती पावले उचलावीत. पोलिसांनी परिवहन विभागाला अपघाताची माहिती द्यावी, यामुळे अपघाताची कारणे आणि त्यावर करावयाच्या उपायोजनांबाबत संबंधित यंत्रणांना कार्य करता येईल. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासोबतच अपघातातील जखमींना मदत आणि अपघातावरील उपाययोजना करण्यावर यंत्रणांनी भर द्यावा. यामुळे अपघाती मृत्यूची संख्या कमी होण्यास मदत मिळेल.

### रॅली ला दाखविली हिरवी झेंडी

रस्ता सुरक्षा अभियानांर्गत हेल्मेटबाबत जनजागृतीसाठी हेल्मेट रॅली काढण्यात आली. बैठकीपूर्वी जिल्हाधिकारी कटियार यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवली. रस्ता अपघातामध्ये शहरी भागात मृत्यू अधिक होत असल्यामुळे नागरिकांनी हेल्मेटचा उपयोग करावा, असे आवाहन केले. ही रॅली जिल्हाधिकारी कार्यालयातून निघून गर्ल्स हायस्कूल, बसस्थानक, रेल्वे स्टेशन चौक, राजकमल, राजापेठ जयस्तंभ मार्गे निघून शहर वाहतूक शाखा येथे समारोप झाला. प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**नगर परिषद कार्यालय अचलपूर**
**पाणी पुरवठा विभाग**
**निविदा सुचना**

**क्र. पापुयो/०६/२०२४-२५**

मुख्याधिकारी अचलपूर नगर परिषद करिता खालील दर्शविलेल्या कामाकरीता योग्य त्या वर्गात पंजीबद्ध असणाऱ्या कंत्राटदार/पुरवठादाराकडून निविदा मागवित आहेत. निविदा मुख्याधिकारी यांचे कार्यालयात दिनांक २७/०१/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यंत पोहचतील अशा बेताने सादर कराव्यात. शक्य झाल्यास सर्व निविदा त्याच दिवाशी दुपारी ५.०० वाजता उपस्थित निविदाकारासमक्ष उघडण्यात येतील कामासंबंधी अधिक माहिती व कोरे निविदा प्रपत्र कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा विभाग, अचलपूर नगर परिषद यांचे कार्यालयात निविदा प्रसिद्धी पासुन दिनांक २४/०१/२०२५ ला दुपारी २.०० वाजे पर्यंत निर्धारित मूल्य भरून प्राप्त करता येतील.

कामासंबंधी सुरक्षा रक्कम १ % रोखीने व ९ % देयकातुनकपात करण्यात येईल तांत्रिक मंजूरीनुसार दरासह परिमाणात होणारा फेरबदल संबंधित कंत्राटदारास बंधाकारक राहील निधीच्या उपलब्धतेनुसार कामाचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | अनामत रक्कम कोरे | निविदा प्रपत्राचे मूल्य |
|---|---|---|---|---|
| १. | पाणी पुरवठा विभाग अंतर्गत पाणी देयक प्रिटिंग करणे. | २.५० लक्ष | २०००/- | १००/- |
| २. | पाणी पुरवठा विभाग अंतर्गत जाहिर मुनादी प्रसिद्धी करणे. | १.०० लक्ष | १०००/- | १००/- |

**अटी व शर्ती :-**

१. पुरवठादार/कंत्राटदार कडे दुकान परवाना/पुरवठा परवाना आवश्यक आहे.
२. निविदे सोबत Income Tax प्रमाणपत्र पॅनकार्ड, रजिस्ट्रेशन आवश्यक.
३. निधीच्या उपलब्धतेनुसार देयकाचे शोधण तसेच देयकातून शासकीय नियमाप्रमाणे सर्व कपाती करण्यात येतील.
४. कोणतीही निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहे.

**( धीरजकुमार गोहाड )**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद अचलपूर**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# वृंदावन कॉलनी बनली होती जामताडा

## ऑनलाईन लुटण्याचे केंद्र, मात्र दर्यापूर पोलीस अनभिज्ञ





**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, (दि.16)**- शहरातील वसंतनगर परिसरातील वृंदावन कॉलनी चक्क छत्तीसगडमधील कुख्यात गाव जामताड्याप्रमाणे बनलेले होते. येथील एका घरात अनेक दिवसांपासून ऑनलाईन लुटण्याचे केंद्र सुरु असताना दर्यापूर पोलीस मात्र यापासून अनभिज्ञ होते. येथे भाड्याने राहत असलेल्या 13 युवकांना मुंबई पोलिसांनी बुधवारी दुपारी 1 वाजता अचानक धाड टाकून ताब्यात घेतले.

परिसरात पोलिसांची दोन वाहने अचानक दाखल झाल्याने परिसरात नागरिकांची गर्दी झाली होती. यावेळेस पोलिसांनी युवक राहत असलेल्या घरात घुसून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चारचाकी वाहन, अनेक मोबाइल, लॅपटॉप, इतर साहित्य सुद्धा जप्त केले. नेमके प्रकरण काय, याची मुंबई पोलिसांना विचारपूस केली असता, त्यांनी याबाबत माहिती देण्यास नकार दिला. परंतु, हे प्रकरण क्रिप्टो करन्सी ऑनलाइन फ्रॉडचे असल्याचे दर्यापूर पोलिसांकडून सांगण्यात आले.



### परिसरातील नागरिकही अनभिज्ञ

ताब्यात घेतलेल्या युवकांना वर्क फ्रॉम होमचे आमिष देण्यात आले होते. तुम्हाला क्रिप्टो करन्सीवर लक्ष ठेवून ओटीपी जनरेट करून मिळाल्यावर ती शेअर करायची आहे, असे मुख्य आरोपीने सांगितले होते. तो पुण्याचा असल्याचे सांगितले जात आहे. वरळी (मुंबई) च्या ना. म. जोशी मार्ग पोलिस ठाण्यात दाखल प्रकरणावरून मुंबई येथील तपास पथक दर्यापुरात दाखल झाले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने युवकांचे मोबाइल लोकेशन शोधून त्यांनी वृंदावन कॉलनीतील बंडू पवार यांचे घर गाठले. त्यांच्या घरी सात ते आठ तरुण मुले भाड्याने राहत असल्याची माहिती नागरिकांना होती. तथापि, येथे वेगवेगळ्या चार खोल्यांमध्ये 18 ते 22 वर्षे वयोगटातील एकूण 13 युवक आढळून आले. युवकांची अंगझडती घेतली असता, त्यांच्याजवळ एकूण 42 मोबाइल, एक कार व दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

# जनतेमूळेच संघटना वटवृक्षात रुपांतरीत- सुशील बेले

## आक्रोश जनशक्ती संघटनेचा वर्धापन दिन

## राजमाता जिजाऊ व रमाई जयंती साजरी



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,(दि.16)**- अगदी दोन वर्षाच्या कालावधीत एका संघटनेचा वटवृक्ष निर्माण होतो, तेव्हा त्या संघटनेची विविध लोकांची बांधिलकी असते, जनतेमूळेच संघटना वटवृक्षात रुपांतरित झाले असल्या असे उद्गार आक्रोश जनशक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुशील बेले यांनी काढले, ते आयोजित संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त बोलत होते. या औचित्यावर राष्ट्रमाता जिजाऊ, माता सावित्री आणि माता रमाई यांच्या जयंतीही साजरी करण्यात आली. शहरातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात या कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून अरविंद गजभिये, प्रमुख पाहुणे म्हणून रजणी फुलसांवदे, प्रिती गजभिये आवर्जून उपस्थित होते.

सुशील बेले पुढे म्हणाले की, आक्रोश जनशक्ती संघटनेची स्थापना केली तेव्हा मी फक्त एकटाच होतो. परंतु, जसजसा संघटनेचा विस्तार वाढत गेला, तसतसे लोक जुळत गेले आणि आज पाहता या संघटनेचा वटवृक्ष तयार झाला आहे. या संघटनेच्या माध्यमातून मला समाजात काम करण्याची एक संधी मिळाली. त्या संधीचं सोनं म्हणून मी नुकतीच विधानसभेची निवडणूक लढविली. लोकांनी मला भरभरून प्रतिसाद दिला. परंतु धनदांडग्यांच्या तुलनेत मी कुठेतरी कमी पडलो आणि मला या निवडणुकीत पराजय पत्करावा लागला. परंतु मी कसल्याही प्रकारची हार न मानता दुसऱ्या दिवसापासून समाजाच्या सेवेसाठी कामाला लागलो. पराजयाची त्याची पर्वा नाही करता समाजासाठी काम करण्याची संधी या संघटनेच्या माध्यमातून मी कदापीही सोडणार नाही असे सुशील बेले यांनी आवर्जून सांगितले. या प्रसंगी संघटनेचे वरूड, मोर्शी तालुक्यातील आजी, माजी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. महिला आघाडीच्या वतीने खुप सुंदर असे गीत गायन व सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य सादर केले. सर्व एकनिष्ठ भावा बहिणींचे संघटनेच्या वतीने सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ?ड.प्रदीप दुपारे यांनी केले. सूत्रसंचालन योगेश बिंसाद्रे तर आभार प्रियंका जगदेवे यांनी मानले.

# शहरात कलम 37 (1) व (3) लागू

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.16)**- शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस आयुक्त (अमरावती शहर) यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम 37 (1) व (3) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावा, याकरिता अमरावती पोलिस आयुक्तालयाच्या परिसरात शुक्रवार, दि. 17 जानेवारीपासून लागू करण्यात येणार असून शुक्रवार, दि. 31 जानेवारी 2025 च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील.

या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस आयुक्त (अमरावती शहर) नविनचंद्र रेड्डी यांनी कळविले आहे.

# भिलखेडा येथील अंगणवाडीत चिमुकल्यांचे बोरन्हाण

## अंगणवाडी सेविका तथा जिल्हा परिषद शाळेचा स्तुत्य कार्यक्रम



> बोरन्हाण हे लहान मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी मकर संक्रांतीच्या दिनावर करण्यात येणारी पारंपारिक पद्धत आहे. या पारंपरिक पद्धतीचे महत्त्व कायम राहावे तसेच महिलांना हिरव्या पालेभाज्याचे शरीराला होणारे फायदे माहीत व्हावे, यासाठी असले कार्यक्रम राबविणे आवश्यक असते
> **डॉ निता नागले,**
> **वैद्यकीय अधिकारी,**
> **मोथा उपकेंद्र.**

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी(दि.16)** - बोरन्हाण (लुट) हे लहान मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी मकर संक्रांतीच्या दिनावर करण्यात येणारी पारंपारिक पद्धत आहे. ही पारंपरिक पध्दत मोडीत निघू नये यासाठी मेळघाटच्या भिलखेडा येथील अंगणवाडी सेविका तथा जिल्हा परिषदेच्या शिक्षिका यांच्या पुढाकारातुन अंगणवाडी केंद्रात बोरन्हाण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी चिमुकल्यांचे बोरन्हाण तथा महिलांसाठी हेल्दी(स्वास्थवर्धक) हळदी, कुंकु घेण्यात आले.

मकर संक्रांत हा प्रामुख्याने महिला वर्गासाठी महत्त्वाचा सण असतो, किंबहुना हा महिलांसाठीचाच सण असतो. हे खरे असले तरी हा सण महिला इतकाच लहान चिमुकल्यांसाठी ही खास असतो कारण मकर संक्रांतीच्या दिवसांत लहान मुलांचे बोरन्हाण केले जाते. बोरन्हाण हे लहान मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी करण्यात येणारी पारंपारिक पद्धत आहे. लहान मुलांना बदलत्या ऋतुची बाधा होऊ नये म्हणून या काळात मिळणारी फळे उदारणार्थ बोर, उसाचे तुकडे, भुईमुगाच्या शेंगा लहान मुलांच्या डोक्यावरुन टाकल्या जाते. त्यानंतर तेथे आलेल्या लहान मुलांनी ते बोरे, गोड- गोड उसाचे पेर, तिळाची बोरे उचलून खावीत व बोरन्हाणच्या माध्यमातून ती लहान मुलांच्या पोटात जावे हा त्याच्या मागचा उद्देश असतो. मात्र सध्या या बोरन्हाणच्या ट्रेंड थोडा बदलला असून यात काही जण चॉकलेट्सही टाकतात, मात्र ट्रेंड काहीही होऊ द्या, मात्र लहान मुलांचे बोरन्हाण करण्याची परंपरा मोडू नये म्हणजे झाले हीच परंपरा जपण्याचे कार्य भिलखेडा येथील अंगणवाडी सेविका रिमु बेलसरे तथा जिल्हा परिषदेच्या शिक्षिका भारती तिवारी, बेलसरे यांनी पुढाकार घेत अंगणवाडी केंद्रात चिमुकल्यांचे बोरन्हाण केले. या बोरन्हाण कार्यक्रमाला मोथा उपकेंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.निता नागले, आरोग्य सेविका हिना सौदागर, प्रविणा धाकडे उपस्थित होत्या. यावेळी महिलांना आरोग्य विषयावर डॉ.नीता नागले यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विविध प्रकारचे खेळ आयोजित करण्यात आले. त्या खेळाच्या बदल्यात वाण म्हणून हेल्दी हिरव्या पालेभाज्या देण्यात आल्या. या कार्यक्रमाला गावातील मोठ्या प्रमाणात महिला उपस्थित होत्या.

# कतिया समाजाला अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र बहाल करा!

## उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन



**महासागर प्रतिनिधी**
**वरूड (दि.16)**- वरूड, मोर्शी तालुक्यातील कतिया समाजातील नागरिकांना अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात मोर्शी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

महाराष्ट्रातील कतिया या समाजाचे मध्यप्रदेशातील कतिया समाजासोबत असलेले नातेसंबंध व आडनाव सदृश्यता यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील कतिया समाज हा मध्य प्रदेशात अनुसूचित जातीत समाविष्ट असलेला कतिया समाजच आहे. परंतु त्यांना महाराष्ट्रात अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र बहाल केले जात नाही. चरख्याच्या माध्यमातून तंतुमय कापसापासून सूत कातून धागा तयार करण्याचा पारंपारिक व्यवसाय या समाजाचा राहिलेला आहे. परंतु आधुनिकीकरणाच्या जगात हा व्यवसाय नष्ट झाल्याने या समाजाची परिस्थिती खालावली. रोजगारासाठी विविध राज्यांमध्ये %भटकंती करत हा समाज विविध राज्यांमध्ये व वसला. अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र महाराष्ट्रातील कतिया समाजाला मिळत नसल्याने अनुसूचित जातीचे शैक्षणिक, नोकरीविषयक व इतर कोणतेही योजनात्मक लाभ या समाजातील लोकांना घेता आलेले नाही. त्यामुळे शिक्षणाचा अभाव दिसून येतो. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व कतिया समाजाला जाती प्रमाणपत्र देण्यात यावे.

कतिया समाजाच्या आर्थिक सामाजिक उत्थानासाठी शासन स्तरावरून समिती गठीत करण्यात येऊन सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. तसेच महाराष्ट्रातील कतिया समाजाला अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र बहाल करण्याबाबत मोर्शीचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान अमरावती जिल्हा कतिया समाज संघटनेचे अध्यक्ष बिस्तुराम नागवंशी, उपाध्यक्ष अन्वर खुरवंशी, सचिव हुकूम नायक ॲड.आशिष वानखडे, अंजित जवारे, शिवदास भंडारी, सुमरू नागवंशी, राजू नागवंशी, बन्नी बानवंशी यांचेसह असंख्य कतिया समाज बांधव उपस्थित होते.

# शाहू महाराज विद्यालय तालुक्यात प्रथम

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धा



**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर, (दि.16)** - राहुल व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित शाहू महाराज विद्यालय व श्री वसंतदादा पाटील कनिष्ठ महाविद्यालय सालोड कसबा तालुका नांदगाव खंडेश्वर ला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन अंतर्गत सन 2024-25 चा प्रथम पुरस्कार जाहीर झाला.

तालुकास्तरीय क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात आमदार प्रतापदादा अडसड यांच्या शुभहस्ते तसेच गटविकास अधिकारी डॉ. स्नेहल शेलार, गटशिक्षणाधिकारी कल्पना ठाकरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक तथा प्रचार्य अविनाश पवार तसेच शाळेतील सहाय्यक शिक्षक विकास फसाटे यांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. प्रथम पारितोषिक तीन लाख रुपये असे बक्षिसाचे स्वरूप आहे. नांदगाव तालुक्यातून या स्पर्धेत सहभागी होऊन हा पुरस्कार मिळवण्यासाठी शाळेचा परिसर, भौतिक सुविधा, उपस्थिती, सुसज्ज संगणक कक्ष, विविध शालेय स्पर्धा, शालेय व्यवस्थापन, शालेय उपक्रम आदी घटकांवर आधारित गुणदान करून विद्यालयाची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर आणि विद्यमान अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, संचालिका प्रा. शुभांगी अभ्यंकर यांचे मुख्याध्यापकांनी सर्व अभिनंदन केले व हे सर्व श्रेय त्यांना अर्पण केले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे अथक परिश्रम, विद्यार्थी व पालकांच्या सहकार्यामुळेच हा पुरस्कार मिळाल्याचे मुख्याध्यापक म्हणाले.

### अभ्यासात आणखी रुची वाढविण्याचा प्रयत्न

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर यांनी विद्यार्थी हितांच्या दृष्टीने निसर्गरम्य वातावरणात या विद्यालयाची स्थापना करून ग्रंथालय कक्ष, मुख्याध्यापक कक्ष, शालेय पोषण आहार साठा कक्ष, क्रीडा कक्ष, सभागृह, मुला मुलीं करिता प्रसाधन गृह, पाण्याचा जलकुंभ, प्रवेशद्वार, क्रीडांगण, व्यायामशाळा, क्रीडा साहित्य, फर्निचर इत्यादी सर्व भौतिक सुविधा या विद्यालयाला उपलब्ध करून दिल्यात, जेणे करुन विद्यार्थ्यांची अभ्यासामध्ये आणखीन रुची वाढावी.

# गतवर्षीचे अभिवचन नववर्षात पुर्ण!

## बच्चू कडू व डॉ.नयना कडू यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण



### सुसज्य ग्रंथालय आणि अभ्यासिकेसाठी ही निधी

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार, (दि.16)** - गतवर्षी दिलेल्या अभिवाचनाची पूर्तता करत बच्चू कडू यांनी आपल्या कर्तव्यतत्परतेचा परिचय दिला. मागील वर्षी आपल्या आईच्या स्मृतिप्रित्यर्थ सावित्रीबाई फुले विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय हिरूर कसबा येथील शाळेच्या प्रांगणात सावित्रीबाई फुले यांचा पुतळा तसेच अभ्यासिका व ग्रंथालयासाठी निधी देण्याचे आश्वासन दिले होते. नववर्षात सोमवारी स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने तसेच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून बच्चू कडू यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणा देणाऱ्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. एवढेच नाही तर ग्रंथालय व अभ्यासिकेसाठी वीस लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद करून त्याचेही लोकार्पण करण्यात आले.

सावित्रीबाई फुले विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय हिरूर कसबा येथील स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने दरवर्षी बच्चू कडू उदघाटक म्हणून उपस्थित राहत असतात. मागील वर्षी बच्चू कडू यांनी सावित्रीबाई फुले यांच्या नावाने ही शाळा आहे, सावित्रीबाई फुले यांचे कार्य फार मोठे आहे, त्यांनी हातात खडू घेतला नसता तर आजची पिढी सुशिक्षित झाली नसती म्हणून विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा एक सावित्रीबाई फुले यांचा पुतळा शाळेच्या प्रांगणात आपली आई स्व. इंदिराबाई कडू यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्याचे आश्वासन त्यावेळी दिले होते. सोबतच ग्रंथालय व अभ्यासिकेसाठी वीस लक्ष रुपयांचा निधी देण्याचे सुद्धा आश्वासन दिले होते. यावर्षी चार लक्ष रुपये खर्च करून बांधलेल्या सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण लोकनेते बच्चू कडू व डॉ.नयना कडू यांच्या हस्ते करण्यात आले. आपण दिलेल्या वचनांची पूर्तता केल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर होते मात्र शाळेच्या आवारात सावित्रीबाई फुले यांचा प्रेरणादायी पुतळा बसविल्याने विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा उत्साह दिसत होता.

यावेळी कार्यक्रमाला डॉ नयना बच्चू कडू उद्घाटक म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नंदकिशोर रोकडे (शिक्षण विस्तार अधिकारी) होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था, हिरूर पूर्णाचे अध्यक्ष नामदेवराव काटोलकर , अशोकरावज तायडे,रमेशपंत नागापुरे, बाळकृष्ण शहाकार, काशिराव डवरे, केशवराव भुस्कडे, साहेबरावजी कांडलकर तसेच प्राचार्य गजेंद्र शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# महावितरणच्या कारवाईत 30 लाखाची वीज चोरी उघड

## 54 ग्राहकांनी मिटरमध्ये छेडछाड करून मीटर केले फॉल्टी | दंडासहित वीजबिल न भरल्यास फौजदारी गुन्हा

**अमरावती सेवरा ब्यूरो**
**अमरावती, (दि.16)** - अमरावती शहरात महावितरणने मागील पंधरा दिवसात केलेल्या कारवाईत 54 वीज ग्राहकांनी मिटर मध्ये छेडछाड करून मीटर फॉल्टी केल्याचे प्रकार समोर आले आहे. 1 लाख 21 हजार 460 वीज युनिटच्या वीज चोरी पोटी महावितरणने या ग्राहकांवर 29 लाख 40 हजाराचा दंड ठोठावला आहे.

महावितरणचे संचालक संचलन श्री अरविंद भादीकर यांनी अमरावती येथे बैठ घेऊन वितरण हानी कमी करण्याचे सक्त निर्देश दिले होते.त्यानंतर अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात सर्वच विभागात वीज चोरी विरोधात मोहिम सुरू करण्यात आली आहे.



अमरावती शहरात उघड करण्यात आलेल्या 54 वीज चोरांपैकी 27 वीज ग्राहकांनी 18 लाख 34 हजाराची दंडात्मक रक्कम भरून आपली सुटका करून घेतली आहे. उर्वरित 27 ग्राहकांवर कायदेशीर कारवाईची प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. यासोबतच अमरावती ग्रामीण विभाग 65 ग्राहकांनी 22 लाखाची,मोर्शी विभागात 53 ग्राहकांनी 12 लाखाची आणि अचलपूर विभागात 38 लाखाच्या 202 वीज चोऱ्या उघड करण्यात आल्या आहेत. वीज मीटर मध्ये फेरफार अथवा छेडखानी करणे हा विद्युत विद्युत कायद्यानुसार गुन्हा असून या अंतर्गत संबंधित वीज ग्राहकावर कलम 135 अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.तसेच अशा ग्राहकांवर वीज चोरी करण्यात आलेल्या युनिटच्या दुप्पट रक्कम आकारण्यात येते.प्रति केडब्ल्यूएचपी नुसार औद्योगिक ग्राहकावर 10 हजार रुपये, वाणिज्यिक ग्राहकावर 5 हजार रुपये तर इतर वर्गवारीतील ग्राहकावर 2 हजार रुपये दंडात्मक कारवाई म्हणून तडजोडीचे शुल्क आकारण्यात येतो.वीज चोरीच्या गुन्ह्यात 3 वर्षापर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे.तसेच वीज मीटर मध्ये फेरफार करण्यासाठी प्रवृत्त व सहकार्य करणाऱ्या विरुद्ध विद्युत कायद्यातील कलम 150 नुसार गुन्हा दाखल करण्याची तरतूदही आहे.

# वसंतराव नाईक महाविद्यालया कडून ग्रामीण विशेष शिबीर

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी, (दि.16)** - येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाकडून ग्रामीण विशेष शिबीराचा उद्घाटन सोहळा संस्थेच्या अध्यक्षा विणा मालविय यांच्या अध्यक्षतेखाली गटविकास अधिकारी (पंचायत समिती धारणी) भिलावेकर यांच्या हस्ते संपन्न पार पडला

या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के.देशमुख, सरपंच काया जावकर उपस्थित होते. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी उपस्थित होते. या शिबिराचा यशस्वीतेसाठी सहाय्यक कार्यक्रम



अधिकारी प्रा.गुटटे, सहाय्य महिला अधिकारी प्रा.मुंढे, प्रा. जुमळे यांनी विशेष प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्रीखंडे तर आभार प्रदर्शन प्रा.गुट्टे यांनी मानले.